जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
लोकमत

# 'नॅसकॉम' कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाचा करार

## विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपनीज् 'नॅसकॉम'च्या आयटी सेक्टर स्किल्स कौन्सिल यांच्यामध्ये शुक्रवारी (दि. ४) कॉर्पोरेट कॅम्पस कनेक्टसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

या करारामुळे विद्यापीठामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे कौशल्य शिक्षण मिळेल. आयटी उद्योगालाही प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला.

या करारामुळे नॅसकॉममार्फत फ्युचर स्किल प्रोग्रॅमच्या माध्यमातून तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

नॅसकॉमकडून डेटा टेक लॅब (पुणे), टुडीप टेक्नॉलॉजिज् (पुणे) आणि व्हिक्रेटेक कन्सल्टिंग (पुणे) या तीन कंपन्यांच्या मार्फत अधिविभागातील विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रासाठी उपयुक्त कौशल्ये आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मोफत मिळेल. या करारामुळे भविष्यात तंत्रज्ञान अधिविभागामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सायन्स या संदर्भातील सेंटर ऑफ एक्सलेन्स स्थापन करण्यासाठीही नॅसकॉमच्या तज्ज्ञांचे साहाय्य उपलब्ध होईल. यावेळी प्र -कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि नॅसकॉमचे वरिष्ठ संचालक डॉ. चेतन सामंत यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. एस. एन. सपली, सौरभ मिश्रा, रोहित प्रसाद, डॉ. अमित अंदरे, अभिषेक राठी, कृष्णकुमार द्विवेदी उपस्थित होते.


11 OCT 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वस्त्रोद्योगातील प्रदूषक रंगद्रव्यांपासून पिण्यायोग्य पाण्याची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठाच्या रसायन शास्त्रज्ञांचे संशोधन; यूके पेटंट प्राप्त


डॉ. के. एम. गरडकर


डॉ. नाना गावडे


डॉ. महादेव सुवर्णकार


डॉ. संतोष बाबर

कोल्हापूर : इचलकरंजी परिसरात मोठ्या प्रमाणात वस्त्रोद्योग आहेत. या वस्त्रोद्योगांमधून विषारी रंगद्रव्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. पर्यावरणाला हानिकारक अशा रंगद्रव्यांवर सूर्यप्रकाशाच्या साहाय्याने प्रक्रिया करून ती पूर्णतः नष्ट करून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी केले आहे. त्यांच्या या संशोधनाला यूके पेटंट प्राप्त झाले आहे.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. के. एम. गरडकर आणि त्यांचे सहकारी डॉ. नाना गावडे, डॉ. संतोष बाबर आणि डॉ. महादेव सुवर्णकार यांनी या संदर्भातील संशोधन साकारले आहे. संशोधनांतर्गत पर्यावरणपूरक मेटल ऑक्साईड नॅनोकम्पोझिट अत्यंत सोप्या पद्धतीने तयार करून त्यांचा वापर उत्प्रेरक म्हणून केला. ही संपूर्ण प्रक्रिया सूर्यप्रकाशात घडवून आणली जाते. याअंतर्गत पर्यावरणाला हानिकारक असणारी रंगद्रव्ये पूर्णपणे नष्ट करून पिण्यायोग्य पाणी तयार केले जाते. ही प्रक्रिया फारशी खर्चिक नसल्याने वस्त्रोद्योगांसाठी एक प्रकारे वरदानच ठरणार आहे. डॉ. गरडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जलप्रदूषण टाळण्यासाठी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शुद्ध करून पुनर्वापरायोग्य करणे आवश्यक आहे. औद्योगिक सांडपाणी शुद्ध करण्यासाठी नॅनोमटेरियल फोटो कॅटॅलिस्ट हा एक प्रभावी आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पर्याय आहे.

या संशोधकांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
सकाळ

# हिवाळी सत्रातील परीक्षा आता दिवाळीनंतरच होणार

## अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे कारण

कोल्हापूर, ता. १० : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी घाई होऊ नये, यासाठी शिवाजी विद्यापीठाने १५ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी सत्रातील परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. त्या परीक्षा दिवाळीनंतर १२ नोव्हेंबरपासून घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

हिवाळी सत्रात कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांच्या ८६५ परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने केले. परीक्षांचे वेळापत्रकही जाहीर केले. त्यानुसार १५ ऑक्टोबरपासून परीक्षांची सुरुवात होणार होती. पण, नव्या शैक्षणिक धोरणानुसार पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये बदल झाला आहे. त्यासह काही अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यास यावर्षी विलंब लागला. त्यामुळे पहिल्या सत्रातील काही अभ्यासक्रम अद्याप विद्यार्थ्यांना शिकविण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. अभ्यासक्रम पूर्ण करण्याची घाई होऊ नये म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाणार आहे.

> “ विद्यार्थी हित लक्षात घेता अभ्यासक्रम पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी आणि पुढे असलेल्या दिवाळीच्या सुटीमुळे हिवाळी सत्रातील परीक्षा विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार पुढे ढकलल्या आहेत. याचा परिणाम उन्हाळी सत्रातील परीक्षांवर होणार नाही. त्या वेळेत घेतल्या जाणार आहेत.
>
> **- डॉ. अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
तरुण भारत

# विद्यापीठात मंथली इनोव्हेशन चॅलेंज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राच्या' माध्यमातून कृतिशील व नवसंकल्पनांना मूर्तरूप देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या माध्यमातून वर्षभर जिज्ञासूंना विविध प्रश्न शोधण्याकरीता व त्यावर सर्जनशील उत्तरे सुचविण्याकरीता व्यासपीठाची निर्मिती केली आहे. प्रत्येक महिन्याला एक विषय दिला जाईल. यावर विद्यार्थी शिक्षक तसेच नागरीकांनी शोधलेला कल्पक पर्याय, उत्तर द्यायचे आहे. याकरिता गुगल फॉर्मच्या माध्यमातून लिंक तयार केली असून ही लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सस्टेनेबेलिटीए एडटेक आणि ॲग्रीटेक, हेल्थटेक, इमर्जिगटेक, स्मार्टटेक, मोबिलिटी, गर्व्हनमेंट टेक, मिस्सेलिनिअस उपक्रमांमध्ये भेडसावणाऱ्या समस्या व त्यावरील कल्पक उत्तरे अपेक्षित आहेत. अशी केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
तरुण भारत

# विद्यापीठात मंथली इनोव्हेशन चॅलेंज स्पर्धेचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राच्या माध्यमातून कृतिशील व नवसंकल्पनांना मूर्तरूप देण्याची आवड असणाऱ्या विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना रोजच्या आयुष्यात उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सूचविण्याची संधी देण्यात आली आहे.

मंथली इनोव्हेशन चॅलेंजच्या माध्यमातून वर्षभर जिज्ञासूंना विविध प्रश्न शोधणे व त्यावर सर्जनशील उत्तरे सुचविण्यासाठी व्यासपीठाची निर्मिती केली आहे. दर महिन्यास एक विषय दिला जाईल. यावर विद्यार्थी शिक्षक तसेच नागरिक त्या संदर्भातील त्यांनी शोधलेले प्रश्न व त्यावर त्यांनी शोधलेला कल्पक पर्याय अथवा उत्तर, समाधान याची माहिती भरू शकतात. याकरिता गुगल फॉर्मच्या माध्यमातून लिंक तयार केली असून, लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
सकाळ

# शहाजी विधी महाविद्यालयाचे युवा महोत्सव स्पर्धेत यश

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठ आणि आजरा महाविद्यालयातर्फे आयोजित ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात शहाजी विधी महाविद्यालयाने पारितोषिके मिळवली.

यामध्ये लघुपटात आविष्कार कांबळे, सोहम बोंगळे तर एकपात्रीत वैष्णवी पोतदार, वक्तृत्व इंग्रजीत सिद्धी खटावकर, शास्त्रीय गायनामध्ये स्वरांजली वाघुर्डेकर तसेच पाश्चिमात्य एकल गायनात उत्तेजनार्थ श्रावणी पाटील, शास्त्रीय नृत्यामध्ये उत्तेजनार्थ श्रावणी देवधर, शास्त्रीय सुरवाद्यमध्ये उत्तेजनार्थ ओंकार शेवडे, मेहेंदीत उत्तेजनार्थ साक्षी सुतार यांनी यश मिळवले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. संघ व्यवस्थापक प्रा. सुहास पत्की, प्रा. शिवभूषण जाधव, प्रा. श्रुती यज्ञोपवित यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
लोकमत

# चंदगडला बीसीए महाविद्यालय सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

चंदगड : बेळगावसह कर्नाटक राज्यात शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साउथ कोंकण एज्युकेशन सोसायटीने (एसकेई) चंदगड येथे बीसीए महाविद्यालय सुरू केले असून, संगणक क्षेत्रातील उच्च शिक्षणाची सोय केल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष एस. वाय. प्रभू यांनी मंगळवारी दिली.


यावेळी अशोक शानभाग, सचिव मधुकर सामंत, ज्ञानेश कलघटगी, खजिनदार श्रीनाथ देशपांडे, संदीप तेंडुलकर व संस्था पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची मान्यता आहे. प्रशस्त लॅब, अत्याधुनिक वर्ग, उच्चशिक्षित आणि अनुभवी प्राध्यापकवर्ग असून, सध्या प्रवेशप्रक्रिया सुरू तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा करून घ्यावा, असे आवाहन प्राचार्य संतोष चौगुले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2024
लोकमत

# निकिता बुगडे विद्यापीठात प्रथम

गडहिंग्लज : शहरातील डॉ. घाळी



महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेची विद्यार्थिनी निकिता नेताजी बुगडे हिने सूक्ष्मजीवशास्त्र विषयात ९३.४४ टक्के गुण मिळवून विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावून 'कै. दत्तात्रय बांदेराव भोसले' शिष्यवृत्ती मिळवली.

जनसंपर्क कक्ष

11 OCT 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत डांगे कॉलेज विजेता

## नाईट कॉलेज इचलकरंजी उपविजेता, शाहू कॉलेज तृतीय




आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेतील विजयी अण्णासाहेब डांगे महाविद्यालय संघास अरुण खंजिरे यांच्या हस्ते पारितोषिक दिले. यावेळी बाळासाहेब मुरदंडे, सतीश पाटील, नागेश दिवटे, ओमकार हरिदास, विशाल कोथळे, उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाने विजेतेपद मिळवले. यजमान नाईट कॉलेज इचलकरंजी संघ उपविजेता, तर शाहू कॉलेजला तृतीय क्रमांक मिळाला.

नाइट कॉलेज व अण्णासाहेब डांगे महाविद्यालय यांच्यातील अंतिम सामन्यात डांगे कॉलेज संघाने सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला. पूर्वार्धात डांगे कॉलेज संघाने १९ विरुद्ध १२ अशी सात गुणांची आघाडी घेतली. उत्तरार्धातही डांगे कॉलेज संघाने आक्रमक खेळाची रणनिती सुरू ठेवत हा सामना जिंकून पहिल्यांदाच आंतरविभागीय स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. यजमान नाइट कॉलेज संघाला व्दितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

तृतीय क्रमांकासाठी आंबेडकर कॉलेज व शाहू कॉलेज यांच्यात लढत झाली. त्यामध्ये १२ विरुद्ध ६ अशा फरकाने शाहू कॉलेज जिंकला. देशभक्त बाबासाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स, रोटरी क्लब सेंट्रल व रोटरी क्लब हेरिटेज यांच्या वतीने जयहिंद मंडळाच्या क्रीडांगणावर या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. विजेत्यांना संस्थेचे अध्यक्ष अरुण खंजिरे, बाळासाहेब मुरदंडे, सतीश पाटील, नागेश दिवटे, ओमकार हरिदास, विशाल कोथळे, विरुपाक्ष खानाज यांच्या उपस्थितीत पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेमधून निवडलेला संघ झुंझुनू (राजस्थान) येथे १८ ते २३ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी व १० ते १५ नोव्हेंबरला गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली) येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य अश्वमेध क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ कबड्डी पुरूष संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. स्पर्धसाठी शिवाजी विद्यापीठ निवड समिती सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. बी. एन. उलपे, आयुब कच्ची, तर निरीक्षक म्हणून संजय पाटील यांनी काम पाहिले.